
# अध्यक्षीय भाषण



## ९२ वे अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलन सांगली

२० ते २२ जाने. २०१२

**श्री. श्रीकांत मोघे**
**अखिल भारतीय मराठी नाट्यपरिषद, मुंबई**

## नाट्यसंमेलनाचे अध्यक्षीय भाषण

**नमस्कार,**

माझ्या जन्मभूमीच्या काळ्या कसदार मातीतील माझ्या आप्तेष्ट मित्रांनो, माझ्या माय बहिणींनो, आपणा सर्व रसिकांस माझा साष्टांग दंडवत!

एखाद्या माहेरवाशिणीचं सुख स्वत: अनुभवणं पुरुषाच्या नशिबात कधीच नसतं. पण आज नाट्यपंढरी असलेल्या माझ्या सांगलीमध्ये येऊन माझ्या मायभूमीच्या या परिसरात आपल्या सर्वांच्या सहवासामध्ये येण्याची मला जी संधी मिळाली, त्यामुळे एक कलावंत म्हणून माहेरवाशिणीचं हे सुख मला प्रत्यक्ष अनुभवता येत आहे. माझी आजची मन:स्थिती शब्दांत व्यक्त करणं मला खरोखरीच अवघड जात आहे, पण आपण सर्वजण माझीच माणसं असल्यामुळे माझ्या मनाचा हळवेपणा आपण समजून घ्याल अशी मला खात्री आहे.

'महाराष्ट्र टाइम्स'मध्ये जयंत पवार यांनी माझा उल्लेख 'अट्टल रंगकर्मी' असा केला होता. खरं म्हणजे अट्टल जुगारी, अट्टल गुन्हेगार, अट्टल दारुडा, अशा अर्थी हा शब्द वापरला जातो. विनोदाचा भाग सोडून देऊ, पण मराठी माणसाचं रंगभूमीवर जे अलोट प्रेम आहे त्या संदर्भात अट्टल हे विशेषण अत्यंत सन्मानदर्शक, अत्यंत समर्पक असं आहे यात संशय नाही. होय! मी जन्मानंच नट आहे. रंगकर्मी आहे. जसा माझा बंधू जन्मानं कवी आहे. माझा जन्म सांगली जिल्ह्यातील किर्लोस्करवाडीचा. स्वातंत्र्यपूर्व काळातील. तेव्हाची किर्लोस्करवाडी ही महाराष्ट्रातील खऱ्या अर्थानं पहिली उद्योगनगरी होती. पण त्याचबरोबर 'उद्योग, उत्साह आणि आत्मोन्नती' ही त्रिसूत्री जपणारी, औंध संस्थानामधील रखरखीत माळरानावर उभी राहिलेली आणि मानवनिर्मित देखणेपणानं नटलेली ही एक 'नवलोकवस्ती' होती. प्रगत लोकशाहीची कल्पना जोपासणाऱ्या या छोट्याशा संस्थानातील नवनिर्मित देखणी अशी ही उद्योगनगरी होती. पण त्याचबरोबर 'किर्लोस्कर, स्त्री आणि मनोहर' या

मासिकांची ही जन्मभूमी होती. त्या काळी पुणे हे प्रगतिशील महाराष्ट्राचं मुख्य सांस्कृतिक केंद्र होतं. तर किर्लोस्कर, स्त्री, मनोहर हा त्या काळच्या महाराष्ट्राचा उद्‌गार होता.

तो स्वातंत्र्यपूर्व काळ होता. भारताला प्रत्यक्ष स्वातंत्र्य मिळण्याची सुतराम शक्यताही न वाटणारा असाच तो काळ होता. पण प्रत्यक्ष स्वातंत्र्य मिळालंच तर त्यानंतर आपल्या राष्ट्रानं ज्या ज्या प्रगतिशील मार्गांचा अत्यंत वेगानं अवलंब करायला हवा अशा सर्व चळवळी सातारा, कऱ्हाड, सांगली आणि किर्लोस्करवाडीच्या मातीत कसदारपणे वाढत होत्या. अत्यंत जोमानं आकारास येत होत्या.

नाटकात काम करणं, नट होणं म्हणजे भिकेचे डोहाळे लागणं असाच समज असणाऱ्या त्या काळात तेव्हाचं नाटक, तसंच त्या भागात नव्यानं निर्माण झालेला सिनेमा, चित्रपटसृष्टी या नव्या कलेबद्दलही अत्यंत आदराचं, कुतूहलाचं वातावरण विशेषत: किर्लोस्करवाडीमध्ये होतं. किर्लोस्करवाडीतील गणेशोत्सवामध्ये वाडीतील समाजमंदिरात माझ्या वडिलांनी (तेव्हा मी फार फार तर सहा-सात वर्षांचाच असेन.) पोवाडा म्हणण्यासाठी म्हणून मला रंगभूमीवर उभं केलं.

छानसा सुरवार-झब्बा घालून दिमाखदार भगवा फेटा बांधून असा मी उभा ठाकलो. पडदा उघडला. मी प्रकाशझोतात न्हाऊन निघालो आणि खरंच सांगतो, भीतीचा लवलेशही मनाला शिवला नाही. उलट जणूकाही मला माझी जागा सापडली. माझा पोवाडा भलताच रंगला. पडद्याबाहेरील प्रेक्षकांत कडाडून टाळी पडली आणि रंगभूमीवर एका नटाचा जन्म झाला. भराऱ्या मारण्यासाठी मला माझे अवकाश सापडले.

अन्न, वस्त्र, निवारा या माणसाच्या मूलगामी गरजा. त्या गरजा भागल्या की माणूस मनोरंजनाच्या शोधात निघतो. रेडिओ हे त्या काळी मनोरंजनाचं एक प्रमुख साधन होतं. दुर्दैवानं आता ते पार मागे पडलं आहे. आजमितीस नाटक, सिनेमा आणि टेलिव्हिजनवरील कार्यक्रम हीच माध्यमं माणसाची करमणुकीची भूक भागविणारी साधनं झाली आहेत. अन्न, वस्त्र, निवारा या माणसाच्या



मूलभूत गरजा आहेत हे खरंच आहे, पण या गरजा भागल्या की मग मात्र माणसाची करमणुकीची भूक प्रकर्षानं जागी होते. काळानुसार करमणुकीची साधनंही झपाट्यानं बदलत असतात. विसाव्या शतकाच्या मध्यापासून म्हणजे १९५५च्या आसपासच्या काळापासून जवळजवळ या शतकाच्या अखेरीपर्यंत नाटक हेच मुख्यत्वे मराठी मध्यमवर्गीयांच्या करमणुकीचं साधन होतं. त्याच्या जोडीला मराठी सिनेमा आणि टेलिव्हिजन हे नव्यानं अस्तित्वात आलेले कलाप्रकारही करमणुकीच्या साधनांमध्ये समाविष्ट झाले होते. पण नव्या महाराष्ट्रात कालचा हा मध्यमवर्ग खूपच बदलला आहे. आता काहीसा जातपातविरहित असा नवा मध्यमवर्ग समाजात निर्माण होतो आहे, झाला आहे. हा नवा मध्यमवर्ग म्हणजे केवळ आर्थिकदृष्ट्या संपन्न झालेला वर्ग नव्हे तर नवं ऐकणारा, नवं पाहणारा, नवा विचार करणारा, जुनाटपणाला आव्हान देणारा असा हा प्रेक्षकवर्ग आहे. आजमितीस ११ कोटी लोकसंख्या असलेल्या महाराष्ट्रामध्ये आज हा वर्ग खरोखरीच मोठ्या प्रमाणात वाढला आहे. या वाढलेल्या प्रेक्षकवर्गामुळेच नाटकांच्या नाट्यकलेच्या संदर्भामध्ये खूपच आशादायक असं काही घडतं आहे, घडणार आहे. मराठी नाट्यलेखनाच्या इतिहासामध्ये जसा किर्लोस्कर, गडकरी, कोल्हटकर, देवल यांच्यापासून पु.ल.देशपांडे, शिरवाडकर, कानेटकर, कालेलकर, बाळ कोल्हटकर, विजय तेंडुलकर यांनी आपला एक ठसा अलीकडील काळावर उमटवला, तसाच मतकरी, सुरेश खरे यांच्यापासून ते आजचा लेखक थेट योगेश सोमण, शफाअत खान, गिरीश जोशी, जयंत पवार, केदार शिंदे यांच्यापर्यंत प्रत्येकानं आपल्या स्वतंत्र्य शैलीनं अनेक अस्पर्श विषयांना समर्थपणे हाताळलं आहे. स्त्रीभ्रूणहत्येवरील ‘स्त्री सुक्त’ हे योगेश सोमण यांचं पथनाट्य या प्रकाराचं आधुनिक उदाहरण ठरेल आणि हे व अशी काही नवीन नाटकं हेच मराठी नाट्यविषयातील नवं बलस्थान आहे असं मला वाटतं. नाटक या माध्यमामध्ये सर्वात महत्त्वाचा घटक ‘नाटककार’ हाच होय. म्हणूनच माझे पूर्वसुरी मास्टर दत्ताराम, परशराम सामंत, नानासाहेब फाटक आदि श्रेष्ठ मंडळी नाटककारांच्या संदर्भात बोलताना त्यांना ‘कवी’ असंच आदरानं ओथंबून

संबोधित असत. अत्यंत नेमक्या आणि मोजक्या शब्दांत ज्यामध्ये खूप आशय सामावलेला आहे असा विषय मांडणारा तो कवी.

शब्दांत नसते दु:ख, शब्दांना सुखही नसते
ते वाहतात जे ओझे, ते तुमचे माझे असते

एक मोठा निबंध लिहूनही जो आशय उलगडणार नाही तो अशा नेमक्या शब्दांत लिहिणारा तोच खरा कवी. नाटकाचंही असंच आहे. केवळ १८ वर्षे वयाच्या भीष्मापासून ते थेट शंभरी ओलांडलेल्या भीष्माचा प्रदीर्घ काळ केवळ तीन–साडेतीन तासांत नेमक्या शब्दांमध्ये 'मत्स्यगंधा' या नाटकात कानेटकरांनी मांडून दाखविला आहे. हे केवळ एक प्रतिभावंत नाटककाराचंच सामर्थ्य होय. शिरवाडकरांचा 'नटसम्राट', मतकरींचं 'अश्वमेध', कानेटकरांचं 'हिमालयाची सावली' अशी नाटकांची अनेक उदाहरणं वानगीदाखल आपल्याला आठवतील. असं अस्सल नाटक जेव्हा प्राण फुंकून ते रंगभूमीवर जिवंत उभं करणं हीच नटाची आणि दिग्दर्शकाची खरीखुरी कसोटी असते. हिंदीमध्ये ज्याला 'गागर मे सागर' असं म्हणतात, त्याचंच हे प्रत्यक्षदर्शी उदाहरण होय!

कलानिर्मितीच्या क्षेत्रात विशेषत: नाट्यनिर्मितीच्या क्षेत्रात मराठी माणूस आज जगात अग्रेसर आहे अशी माझी पक्की धारणा आहे. मराठी माणूस नाटकावर विलक्षण प्रेम करतो आणि असे अनेक प्रतिभावान नाटककार महाराष्ट्रानं दिले आहेत. याचं कारण मराठी माणसाचा एक स्वभावविशेष 'अंथरुण पाहून पाय पसरावे' अशी आपली वृत्ती आहे. पण त्यामुळेच कमीत कमी खर्चात (खर्च करायला एकूण मराठी माणूस खूप घाबरतो.) पण अत्यंत आशयसंपन्न अशी कलाकृती सादर करणं हे त्यातल्या त्यात रंगभूमीवरच शक्य असतं आणि म्हणून जीवनाला सर्वांगीण स्पर्श करणाऱ्या अशा अनेक कलाकृती मराठी रंगभूमीवर सादर करण्यात आल्या आहेत आणि कदाचित म्हणूनच असेल तेंडुलकरांची मराठी नाटकं, त्यांचा महोत्सव अमेरिकेतील एका युनिव्हर्सिटीत साजरा झाला. मराठी रंगभूमीवर अभिमानानं मिरवावं अशीच ही घटना मला वाटते.

मराठी नाट्यचळवळीमध्ये आजमितीस नव्यानं उदयास येत असलेल्या



नव्या पिढीवर माझा खूप विश्वास आहे. पुण्यातील 'पुरुषोत्तम करंडका'पासून अनेक प्रकारे ही तरुण मुलं स्वत:ला रंगभूमीवरून सादर करीत आहेत. अनेक ज्वलंत विषयांना तोंड फोडून मनातली खदखद ही मुलं शब्दांकित, अभिनयांकित करीत आहेत. त्यांना उपलब्ध असणाऱ्या इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजीचा अत्यंत जागरूकपणे उपयोग करून घेताना ही मुलं मला दिसत आहेत. होय, त्यांना भेडसावणारे अनेक प्रश्न त्यांच्यापुढे आ वासून उभे आहेत हे खरं आहे.

मूल्यांचे अवमूल्यन झाले खुला नीतीचा व्यापार
भुकेल्यावरी भरल्यापोटी उपदेशाचा भडिमार।
सवंगतेला मिळे प्रतिष्ठा अस्सल त्याला वनवास
सच्चाईच्या गळ्याभोवती दांभिकतेचा गळफास।
ज्याचे त्याला यथा योग्यता श्रेय पुरे मिळणार कधी
स्वराज्य आले यौवनात पण, सुराज्य हे होणार कधी।

सामान्य माणसाच्या तोंडी ज्याच्यामुळे अन्नाचा घास पडतो त्या शेतकऱ्यांनी दारिद्र्याला कंटाळून विदर्भात शेकडोच्या संख्येनं आत्महत्या केल्या आहेत. तर मुंबईतल्या गिरण्यांमागून गिरण्या बंद पाडल्यामुळे लाखो कुटुंबं मुख्यत्वे मराठी कुटुंबं अक्षरश: उघड्यावर पडली. रस्त्यावर आली आहेत. आपल्याच सरकारचं राज्य चालू असतानाही. याउलट अनेक धनवंत याच काळात थेट आकाशास भिडण्याएवढे धनवंत झाले आहेत.

धनवंतांच्या पायी सगळी सुखे स्वये चालत येती
धनहीनांचे वांझ मनोरथ अगतिकतेने घुसमटती॥
श्रीमंती अन् दारिद्र्याची अत्यंतिक टोके येथे
आलिशान इमल्यांच्या खाली झोपडपट्टी वळवळते॥

होय, माझ्या तरुण दोस्तांनो, असं काही घडत आहे हे खरं आहे.

उष:काल होता होता काळरात्र झाली
अरे पुन्हा आयुष्याच्या पेटवा मशाली।

अशी स्थिती आज आली आहे हे खरंच आहे. पण पदार्थ पूर्ण सडल्याखेरीज

'पेनिसिलीन' तयार होत नाही. हे सगळं खरोखरीच बदलायचं असेल तर ते तुम्हीच बदलणार आहात.

उदासीनता आणि शिथिलता विरघळून जाणार कधी,
चैतन्याची सुप्त अस्मिता सळसळून उठणार कधी।
लोकशाहीच्या तत्त्वामधली जाग आम्हा येणार कधी,
स्वातंत्र्यातील कर्तव्यांचे भान आम्हा होणार कधी ॥
लोकशाहीचे जागरुत पाईक तुम्ही आम्ही बनणार कधी.

तुमच्या पुढे पडणारे हे सारे प्रश्न खरेच आहेत. पण माझा विश्वास आहे, त्याची उत्तरंही तुम्हीच शोधणार आहात. तुम्हाला ती नक्की सापडणार आहेत. कारण भारत हा आजचा सर्वात तरुण देश आहे. १२५ कोटींपेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या या देशातील तरुण पिढीनं मनावर घेतलं तर हे सर्व बदलणं खरोखरच अशक्य आहे का? नक्कीच नाही. मात्र त्यासाठी एकसंध राष्ट्र उभं राहणं आवश्यक आहे. केशवसुतांनी म्हटलेल्या शब्दांत थोडासा बदल करून मी इतकंच म्हणतो–

हिंदू नाही, मुस्लिम नाही, न मी एक पंथाचा
ते मम वैरी जे आंखडिती प्रदेश साकल्याचा ॥
खादाड असे माझी भूक चतकोराने
मला न सुख ना डबक्यामधला मी बेडूक।
मनास माझ्या कुंपण पडणे अगदी मला नसाहे
नव्या मनूतील नव्या दमाचा शूर शिपाई आहे,
मी शूर शिपाई आहे
कोण मला वठणीला आणू शकतो ते मी पाहे।

माझ्या तरुण दोस्तांनो, आशयसंपन्न असं नवं नाटक तुमच्याकडूनच मला मिळेल अशी माझी खात्री आहे. मराठी नाटक आता समुद्रापार पोचलं आहे. तरीही आपल्या स्वत:च्या भूमीत मात्र या क्षेत्रात अनेक त्रुष्टी वेगवेगळ्या स्वरूपात आपल्याला जाणवत राहतात. शिरवाडकरांच्या 'नटसम्राटाचा आक्रोश होता. 'कोणी घर देता का घर? एका वादळाला घर देता का घर?' होय, आज जागोजाग सरकारतर्फे नाट्यगृहे उभारली गेली आहेत. पण योग्य



व्यवस्थेअभावी त्यांची अवस्था खूपच दयनीय म्हणावी अशी असते, दिसते. विशेषत: स्वच्छतागृहे ही अस्वच्छतेचा नमुना म्हणून दाखवावी अशी असतात. हे सर्व आपल्याला कसं चालतं? की आपल्याला याचीच सवय आहे? असो! ध्वनियंत्रणाही अनेक ठिकाणी सदोष असते. खरेतर नाटक हा 'स्पोकन वर्ड'चा प्रकार. प्रेक्षकांपर्यंत शब्द पोचलेच नाहीत तर ते का आणि कसं खपवून घ्यायचं? तर तेही एक असो!

प्रमुख नाट्यकलावंत बऱ्याच सुस्थितीत दिसत असले तरी ज्युनिअर आर्टिस्ट, बॅक स्टेज वर्कर्स यांची स्थिती समाधानकारक नसते.

११ कोटी लोकसंख्या असलेल्या महाराष्ट्रामध्ये भारतातील अन्य कुठल्याही राज्यापेक्षा महाराष्ट्रातील व्यावसायिक रंगभूमी तौलनिकदृष्ट्या सुस्थितीत दिसत असली तरी अनेक गोष्टींची पूर्तता करणं आवश्यक आहे.

नाट्यचळवळीला खरे बरे दिवस आले ते कै. यशवंतरावजींच्या कारकीर्दीत. त्यांच्यामुळेच. त्यांच्या नाटक या विषयावरील प्रेमामुळेच. सुदैवानं आजचे मुख्यमंत्री माननीय पृथ्वीराजजी चव्हाण हेही याच आपल्या मातीतील, कऱ्हाडचे. तसेच आपले पालकमंत्री माननीय पतंगरावजी कदम हे पलूसचे सुपुत्र. नाट्यव्यवसायाला आवश्यक असलेल्या सोयीसुविधांचा विचार आणि त्याची अंमलबजावणी यशवंतरावजींनी सर्वप्रथम केली. या दोन्ही आपल्या माणसांनी ती पुढे न्यावी, अशी माझी त्यांना प्रेमाची, कळकळीची विनंती आहे. कारण मराठी नाटक ही एकसंध भारतीयत्वाचा सन्मान करणारी अशीच मूलगामी चळवळ आहे. हिंदवी स्वराज्याचं स्वप्न पाहणाऱ्या शिवप्रतिभेचा गौरव करणारी अशी ही चळवळ आहे. नवी पिढी आता दंड थोपटून या चळवळीत उतरू पाहते आहे.

जुने जाऊ द्या मरणा लागुन
जाळून किंवा पुरून टाका
सडत न एक्या ठाई ठाका
सावध ऐका पुढल्या हाका
खांद्यास चला खांदा भिडवून ॥

अशी प्रतिज्ञा करून ही नवी पिढी या चळवळीत सामील होईल अशी मला

खात्री आहे.


१९४७ साली भारत स्वतंत्र झाला. 'इटर्नल व्हिजिलन्स इज द प्राईस ऑफ लिबर्टी.' अखंड सावधानता ही स्वातंत्र्यासाठी मोजावी लागणारी किंमत आहे. कारण स्वातंत्र्यातच असे प्रश्न पडतात आणि त्याची उत्तरंही स्वातंत्र्यातच मिळू शकतात. म्हणून मन:पूर्वक जयघोष करायचा तो स्वतंत्रतादेवीचा. आपलं मागणंही तिच्या जवळच मागायचं.

जय स्वतंत्रते, जय स्वतंत्रते, जय स्वतंत्रतेदेवी
भगवती स्वतंत्रतेदेवी
तुझ्या प्रसादे उभ्या भारती वीज संचारावी।
मनामनातून चैतन्याचे खेळू देत वारे
उजळू दे भरत खंड सारे।
उदासीनता देह मनाची पार झडून जावी
भगवती स्वतंत्रतेदेवी।

शब्दामागे कर्तृत्वाचे नित्य असो भान
देही जसा वसे प्राण
उदात्ततेला सामर्थ्याची बैठक लाभावी
भगवती स्वतंत्रतेदेवी।
भरतवर्ष हा मानवतेचा सूत्रधार व्हावा
जगाचा नायक शोभावा
या स्वप्नाची प्रत्यक्षाशी प्रीति भेट व्हावी
भगवती स्वतंत्रतेदेवी॥

**श्रीकांत मोघे**
९२ वे अखिल भारतीय साहित्य संमेलन, सांगली







लक कलाकल्प । २४४५८९४९

अखिल भारतीय मराठी नाट्यपरिषद, मुंबई